■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १३० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे



नवा विश्वविक्रम वैभव सूर्यवंशीचे ५२ चेंडूत द्विशतक

● **दोहा । वीरभूमी–**

आशिया कप रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेत १५ वर्षीय युवा स्टार वैभव सूर्यवंशीने यूएईविरूद्ध वादळी द्विशतक ठोकले. बेबी बॉस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैभवने सर्वांत कमी चेंडूत म्हणजे अवघ्या ५२ चेंडूत द्विशतक ठोकत एक नवा विक्रम नावावर केला. अशी अद्भूत कामगिरी करणारा तो जगातील पहिलाच खेळाडू ठरला.

अवघ्या १६ चेंडूंत अर्धशतक, २८ चेंडूंत लिस्ट-ए मधील सर्वात वेगवान शतक, ४० चेंडूंत १५० धावा आणि त्यानंतर ५२ व्या चेंडूवर षटकार ठोकत ऐतिहासिक द्विशतक पूर्ण केले. वैभवने आपल्या ५३ चेंडूंच्या नाबाद २०४ धावांच्या खेळीत तब्बल २८ षटकार आणि ७ चौकार लगावले.

यूएईने दिलेले २५० धावांचे आव्हान भारत अ संघाने अवघ्या १४.२ ओव्हरमध्ये पूर्ण करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. वैभवने पहिल्याच चेंडूपासून यूएईच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला आणि विक्रमी २८ षटकार आणि ७ चौकार लगावत लिस्ट-ए क्रिकेटच्या एका डावात सर्वाधिक षटकार ठोकण्याचा विश्वविक्रम नोंदवला.

यूएईविरुद्ध खेळताना १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने अवघ्या २८ चेंडूंत शतक ठोकत ऑस्ट्रेलियाच्या जेक फ्रेझर-मॅकगर्कचा (२९ चेंडू) आणि एबी डिव्हिलियर्सचा (३१ चेंडू) सर्वांत वेगवान शतकाचा विश्वविक्रम मोडीत काढला.

पेपर फोडणाऱ्यांना शासनाचा चाप

आता १० कोटींचा दंड तर १० वर्षे तुरुंगवास । शासनाकडून समिती स्थापन

● **मुंबई । वीरभूमी–**

गेल्या काही महिन्यांत अनेक परीक्षांचे पेपर फुटल्याचे प्रकार समोर आले. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी याविरोधात आवाज उठवत राज्य तसेच केंद्र सरकारला धारेवरही धरले. त्यामुळे, आता पेपरफुटी आणि अशा गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी राज्य सरकारने योजना आखल्याचे समोर आले आहे. भरती परीक्षांमधील पेपरफुटी आणि संघटित गैरप्रकार रोखण्यासाठी अधिक कठोर कायद्याची अंमलबजावणी करण्याची शिफारस राज्य सरकारकडून करण्यात आली आहे.





राज्यातील भरती परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी तसेच पेपरफुटी आणि गैरप्रकारांना कायमचा आळा घालण्यासाठी कृति आराखडा तयार करण्यात आला आहे. यानुसार पेपरफुटीच्या संघटित गुन्हेगारीत सहभागी व्यक्ती आणि संस्थांना ७ ते १० वर्षांपर्यंत कारावास, किमान १० कोटी रुपये दंड आणि मालमत्ता जप्त करण्यासह अनेक महत्त्वपूर्ण शिफारसी करण्यात आल्या आहेत. या योजनेमध्ये गैरप्रकारांच्या प्रकारानुसार शिक्षेची तीव्रता निश्चित करण्यात आली आहे. यानुसार, परीक्षेत अनुचित साधनांचा वापर करणाऱ्यांवर ५ ते १० वर्षे कारावास आणि ५० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद सुचवण्यात आली आहे. गैरप्रकारांमध्ये सहभागी आढळणाऱ्या सेवा पुरवठादार संस्थांना ५ कोटींपर्यंत दंड तसेच ८ वर्षांसाठी काळ्या यादीत टाकून बंदी घालण्याची शिफारस करण्यात आली आहे.

परीक्षा गैरप्रकारांचा तपास वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांमार्फत करण्याची शिफारस करण्यात आली आहे. गंभीर प्रकरणांच्या तपासासाठी विशेष कृति दल स्थापन करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. परीक्षा गैरप्रकारांचे खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालयांची शिफारस करण्यात आली आहे. तसेच, न्यायिक प्रक्रिया गतिमान करून प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यासाठी विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्याचीही शिफारस करण्यात आली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. शरणकुमार लिंबाळे



● **पुणे । वीरभूमी–**

आगामी १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची बैठक येथे झाली त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.

येत्या दि. २७ ते ३० जानेवारी २०२७ या चार दिवसांच्या कालावधीत १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरात आयोजित करण्यात आले आहे असे नमूद करून ते म्हणाले, आजच्या महामंडळाच्या बैठकीत अध्यक्षपदासाठी जवळपास १५ पेक्षा अधिक नावे चर्चेत होती मात्र डॉ. लिंबाळे यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. संमेलनातील परिसंवाद, मुलाखत तसेच स्वागताध्यक्ष, उद्घाटक याबाबत नजीकच्या काळात निर्णय घेण्यात येणार आहे मात्र संमेलन हे भपकेबाज न होता साहित्य मूल्य जतन करणे आणि ती विकसित करणे यावर मुख्यत्वे भर दिला जाणार आहे. महामंडळ बैठकीसाठी ९९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, तसेच महामंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

लपंडाव

कधी ओसाड राहत रान
कधी खूप होतो पाऊस
ऊन पावसाच्या खेळात
अधुरी राहते किती हौस

लपंडावाचा खेळ सारा
ना उरली कुणाला भीती
खर दिसत गमावताना
चावी खोटेपणाच्या हाती

SPOT NEWS

वाराणसीत २१ लाख दिव्यांनी उजळून निघाले ८४ घाट

● **वाराणसी** – वाराणसीनगरीत आज देव दीपावलीचा भव्य सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्तिक पौर्णिमेनिमित्त गंगेचे ८४ घाट तब्बल २१ लाख दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाले. जणू काही स्वर्गच पृथ्वीवर अवतरल्याचा भास यावेळी होत होता. या ऐतिहासिक उत्सवाचा अनुभव घेण्यासाठी देश-विदेशातून लाखो भाविक आणि पर्यटक वाराणसीत दाखल झाले. त्यामुळे या नयनरम्य सोहळा याची देही, याची डोळा पाहण्यासाठी घाटांवर लाखो भाविकांनी गर्दी केली होती. देव दीपावली सोहळ्याचा शुभारंभ सायंकाळी ५.१५ वाजता नमो घाटावर करण्यात आला. उत्तर प्रदेशचे पर्यटनमंत्री जयवीर सिंह यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ६ वाजेपर्यंत गंगेच्या सर्व ८४ घाटांवर दिवे प्रज्वलित करण्यात आले. यंदाच्या देव दीपावली उत्सवात एकूण २१ लाख दिवे प्रज्वलित करण्यात आले. त्यापैकी ११ लाख दिवे उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने लावण्यात आले. उर्वरित १० लाख दिवे काशीतील विविध संस्था आणि नागरिकांच्या सहकार्याने प्रज्वलित करण्यात आले. आदी केशव घाटापासून सामने घाटापर्यंत दिव्यांच्या रांगांनी गंगेचा संपूर्ण परिसर उजळून निघाला होता.

शरद पवार निवृत्त होणार नाहीत : खा. सुप्रिया सुळे

● **मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राजकारणातून निवृत्ती घ्यावी आणि त्यानंतर पक्षाने भाजपप्रणीत एनडीएमध्ये सहभागी व्हावे, अशी चर्चा सुरू असल्याचे वृत्त समोर आले. या वृत्तामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मात्र, खासदार सुप्रिया सुळे यांनी या चर्चांना स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. शरद पवार कोणत्याही परिस्थितीत निवृत्त होणार नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

श्रीगोंद्यात पोलिस कर्मचाऱ्यावर धारदार कटरने हल्ला

पो.ना. संग्राम जाधव यांना गंभीर दुखापत । पती-पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

जुन्या गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी गेलेल्या श्रीगोंदा पोलिसांच्या पथकावर हल्ला झाल्याची धक्कादायक घटना मंगळवार दि. २४ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास शहरातील महात्मा फुले उद्यान परिसरात घडली. पोलिसांच्या ताब्यातून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीने पोलीस नाईक संग्राम घनश्याम जाधव यांच्या पोटावर धारदार कटरने वार करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर वीट मारून त्यांच्या पायाला दुखापत केली. यावेळी आरोपीच्या पत्नीनेही दगड मारून जाधव यांना जखमी केले. या प्रकरणी पती-पत्नीविरुद्ध श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक सुभाष सानप व पोलिसांचे पथक जुन्या गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी मंगळवारी शहरात गेले होते. यावेळी शेखऱ्या याद्या पवार (रा. श्रीगोंदा) याच्याकडे चौकशी सुरू



असताना त्याने पोलिसांना विरोध करून पळ काढला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून महात्मा फुले उद्यान परिसरात पकडले.

मात्र, पोलिसांनी पकडल्यानंतरही आरोपीने प्रतिकार सुरूच ठेवला. पोलिस कर्मचारी शासकीय कर्तव्य बजावत असल्याची जाणीव असूनही त्याने कमरेला असलेला धारदार कटर काढून पोलीस नाईक संग्राम जाधव यांच्या पोटावर वार करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पुन्हा पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना जाधव यांनी त्याला पकडले. यावेळी आरोपीने परिसरात पडलेली वीट उचलून जाधव यांच्या डाव्या पायाच्या घोट्यावर मारली.

दरम्यान, आरोपीची पत्नी सुविधा शेखऱ्या पवार ही हातात दगड घेऊन घटनास्थळी धावत आली. तिनेही जाधव यांच्या डाव्या पायाच्या गुडघ्यावर दगड मारून त्यांना दुखापत केली. भरदिवसा शहराच्या मध्यवर्ती भागात पोलिस कर्मचाऱ्यावर पती-पत्नीने हल्ला केल्याने परिसरात खळबळ उडाली.

या प्रकरणी पोलीस नाईक संग्राम घनश्याम जाधव (वय ३८) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शेखऱ्या याद्या पवार व सुविधा शेखऱ्या पवार (दोघे रा. श्रीगोंदा) यांच्याविरुद्ध श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १०६९/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास व कायदेशीर कारवाई सुरू आहे.

राज्यातील उर्वरित शेतकऱ्यांनाही अग्रिम रक्कम नक्की मिळेल : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

● **मुंबई । वीरभूमी–**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शेतक-यांना आधार देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून अग्रिम रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला. आतापर्यंत राज्यातील सुमारे ९७ लाख शेतकऱ्यांना ही अग्रिम रक्कम मिळाली आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, नमो शेतकरी सन्मान योजनेच्या प्रलंबित हप्त्याची फाईल मंजुरीसाठी वित्त विभागाकडे पाठवण्यात आली असून ती रक्कमही लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. दुष्काळी परिस्थितीत ज्या फायनान्स कंपन्या कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांकडे तगादा लावत आहेत किंवा बळजबरी करत आहेत, त्यांची माहिती मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना दिली आहे.



फायनान्स कंपन्यांनी माणुसकी ठेवून शेतकऱ्यांना सहकार्य करावे आणि वसुलीसाठी सक्ती करू नये, अन्यथा सरकारला या कंपन्यांबाबत वेगळा विचार करावा लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. दिवंगत नेते वडकुते यांच्या अन्त्यविधीसाठी ते आले होते; त्यांच्या निधनामुळे राज्याने एक चांगला नेता गमावला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, केंद्र सरकारने नुकतीच एनडीआरएफच्या नुकसान भरपाईच्या दरांमध्ये वाढ केली आहे. या वाढीव दरांनुसार शेतकऱ्यांना जास्तीची मदत मिळावी यासाठी राज्य सरकारने आधी पाठवलेल्या प्रस्तावात दुरुस्ती करून सुधारित फेरप्रस्ताव केंद्राकडे पाठवण्याचे काम सुरू आहे. केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने कृषी, जलसंधारण आणि ग्रामविकास विभागांच्या माध्यमातून तात्पुरत्या आणि दीर्घकालीन योजना राबवण्यास सुरुवात केली आहे.

दत्तात्रय भरणे म्हणाले की, दुष्काळी परिस्थितीत पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चा-याची टंचाई भासू नये, म्हणून चा-याच्या बियाणांपासून शेतक-यांना मदत दिली जात आहे. जून महिन्यापर्यंत दुष्काळाचे संकट संपेपर्यंत सरकार कोणत्याही शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही.

गुरुनानक देवजींच्या ५५७ व्या प्रकाश गुरुपुरबचा भक्तिमय सोहळ्याने गोविंदपुरा गुरुद्वारा निनादला

अखंडपाठ साहिब, कीर्तन दरबार, गुरू का लंगर, रक्तदान शिबिराचे आयोजन । सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व आमदार संग्राम जगताप यांची उपस्थिती

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

शीख धर्माचे प्रथम पातशाही धन धन श्री गुरु नानक देवजी महाराज यांच्या ५५७ व्या प्रकाश गुरुपुरबचा सोहळा येथील ऐतिहासिक गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा येथे मंगळवारी (दि. २४ नोव्हेंबर) मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. गुरुबाणीचे मधुर स्वर, 'वाहेगुरु, वाहेगुरु, धन गुरु नानक'चा जयघोष, अखंडपाठ साहिब, कीर्तन दरबार आणि गुरू का लंगर अशा विविध धार्मिक व सेवाभावी उपक्रमांनी संपूर्ण गुरुद्वारा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या सोहळ्याला अहिल्यानगरसह परिसरातील शीख समाजबांधव आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

प्रकाश गुरुपुरबच्या निमित्ताने १७ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत शहरातील विविध भागांतून दररोज सकाळी प्रभात फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रभात फेऱ्यांमध्ये मोठ्या संख्येने संगत सहभागी झाली होती. गुरुबाणीचे गायन आणि 'वाहेगुरु, वाहेगुरु, धन गुरु नानक'च्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले. पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या या प्रभात फेऱ्यांमधून गुरुनानक देवजी यांच्या विचारांचा आणि शिकवणुकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

प्रकाश गुरुपुरबनिमित्त सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा येथे भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी शीख समाजबांधवांना गुरुनानक देवजी यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक मोहित पंजाबी, जितू गंभीर, संजय चोपडा, बाली बांगरे, प्रा. माणिक विधाते, बाळासाहेब बारस्कर आदी उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, गुरुनानक देवजी यांनी समाजातील वंचितांची सेवा करण्याचा संदेश दिला. त्यांनी लंगरची मुहूर्तमेढ रोवून आपल्याकडे असलेले गरजूना देण्याची शिकवण दिली. फक्त पैसा देणे म्हणजे सेवा नसून, पैसा नसताना देखील श्रमदानातून सेवा करण्याची शिकवण देखील त्यांनी दिली. त्यांचे अमूल्य शिकवण आजही समाजाला प्रेरक असून, ते आत्मसात करुन जीवनात पुढे जाण्याचे त्यांनी आवाहन केले.



गुरुद्वारा साहिब येथे संगतांच्या सहभागातून सांझा अखंडपाठ साहिबचे आयोजन करण्यात आले होते. या अखंडपाठ साहिबचा आरंभ २० नोव्हेंबर रोजी झाला, तर २२ नोव्हेंबर रोजी भोग साहिब संपन्न झाला. यानिमित्त आयोजित कीर्तन दरबारात प्रसिद्ध कीर्तन जथा भाई मनराज सिंग जी (मार्कंडेवाले) तसेच हजुरी रागी भाई अमृत सिंग जी यांनी आपल्या मधुर गुरबाणी कीर्तनाने संगतांना निहाल केले. त्यांच्या भक्तिमय कीर्तन सेवेमुळे संपूर्ण गुरुद्वारा परिसर भक्तिरसात रंगून गेला.

कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत गुरुद्वारा साहिब येथे लंगर सेवेचे आयोजन करण्यात आले होते. हजारो श्रद्धाळू संगतांनी गुरू का लंगर ग्रहण करून या सेवेचा लाभ घेतला. गुरू का लंगरच्या माध्यमातून समानता, बंधुभाव आणि निःस्वार्थ सेवेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला. याचबरोबर गुरुद्वारा समितीच्या सेवादारांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान केले.

प्रकाश गुरुपुरब सोहळ्यादरम्यान समाजातील उल्लेखनीय कार्य आणि योगदानाबद्दल श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट, श्रीराम मंदिर, नवी पेठ यांना पंजाबी परिवाराच्या वतीने 'समाजरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या संस्थेचा या पुरस्काराच्या माध्यमातून सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी गुरुद्वारा समितीचे व शीख समाजाचे अध्यक्ष बलदेवसिंग वाही यांनी सर्व उपस्थित संगत, कीर्तन जथा, सेवादार, मान्यवर, सामाजिक संस्था आणि कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, श्री गुरु नानक देव जी महाराज यांचा 'किरत करो, नाम जपो, वंड छको' हा महान संदेश मानवतेला समानता, प्रामाणिक कष्ट आणि निःस्वार्थ सेवेचा मार्ग दाखवतो. प्रत्येकाने गुरू महाराजांच्या शिकवणुकीचा अंगीकार करून समाजात प्रेम, बंधुभाव आणि एकता जोपासावी.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन गुरुद्वारा भाई दया सिंगजी समितीच्या सर्व सेवादारांनी अत्यंत श्रद्धा, प्रेम आणि समर्पणाने केले होते. या प्रकाश गुरुपुरब सोहळ्यास अहिल्यानगर शहरासह परिसरातील विविध भागांतून तसेच बाहेरगावाहून मोठ्या संख्येने समाजबांधव आणि महिला उपस्थित होत्या. धार्मिक कार्यक्रमांसोबतच रक्तदान, लंगर सेवा आणि सामाजिक संस्थेचा गौरव अशा उपक्रमांमुळे यंदाचा प्रकाश गुरुपुरब सोहळ्यात सेवा, समता, त्याग आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

वीरभूमी

SPOT NEWS



गुरुनानक देवजींच्या जयघोषाने तारकपूर परिसर दुमदुमला

● अहिल्यानगर । वीरभूमी–

'बोले सो निहाल... सत श्री अकाल'चा जयघोष, पारंपरिक वाद्यांचा निनाद, गुरुबाणीचे स्वर आणि भक्तिमय वातावरण... अशा मंगलमय वातावरणात अहिल्यानगर शहरात शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांची ५५७ वी जयंती अर्थात गुरुपुरब मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. गुरुनानक देवजींच्या विचारांचा जयघोष करीत शीख, पंजाबी व सिंधी समाजबांधवांनी काढलेल्या भव्य प्रभात फेरीने तारकपूर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यावेळी आहुजा परिवाराच्या वतीने प्रभात फेरीतील भाविकांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. मंगळवारी (दि. २४ नोव्हेंबर) सकाळी तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथून पारंपरिक वाद्यांच्या गजरात प्रभात फेरीला प्रारंभ झाला. यामध्ये शीख, पंजाबी व सिंधी समाजातील पुरुष, महिला आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात धार्मिक ध्वज, मुखी गुरुबाणी आणि ओठांवर गुरुनानक देवजींचा जयघोष करीत भाविकांनी संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले. तारकपूर परिसरातून मार्गक्रमण करीत प्रभात फेरी टॉपअप पेट्रोल पंप येथे पोहोचली असता जनक आहुजा परिवाराच्या वतीने तिचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रभात फेरीतील वाहनावर विराजमान असलेल्या गुरुनानक देवजींच्या प्रतिमेवर तसेच धार्मिक पोथीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. गुरुनानक देवजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित भाविकांनी सामुदायिक अरदास (प्रार्थना) करीत सर्वांच्या सुख, समृद्धी, आरोग्य आणि शांततेसाठी प्रार्थना केली. या स्वागत सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रसंगी जनक आहुजा, इंद्रजीत नय्यर, राजेंद्र कंत्रोड, बृजमोहन कंत्रोड, हरजितसिंह वधवा, बबलू आहुजा, रिकी कंत्रोड, संजय आहुजा, दिनेश कंत्रोड, जतिन आहुजा, अभिमन्यू नय्यर, किशोर कंत्रोड, अनिश आहुजा, मनमोहन चोप्रा, गौरव कंत्रोड, पियुष कंत्रोड, सौरभ आहुजा, लव खंडुजा, कुश खंडुजा, तनिश कंत्रोड, अक्षय खुराणा, गुनित कंत्रोड, सागर कुमार आदींसह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त मागील सात दिवसांपासून शहरातील विविध गुरुद्वारांसह तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथे विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अखंडपाठ, कीर्तन दरबार, प्रवचन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि लंगर यांचा समावेश होता. या सर्व कार्यक्रमांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदविला.

बालविवाहमुक्तीच्या दिशेने गटेवाडीची प्रेरणादायी वाटचाल!

अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वेक्षणात बालविवाह न आढळलेले चौथे गाव । महिला सक्षमीकरण आणि सामाजिक एकजुटीचा आदर्श

● पारनेर । वीरभूमी–

अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्याच्या उद्देशाने स्नेहालयच्या उडान प्रकल्पामार्फत सुरू असलेल्या जनजागृती अभियानाला पारनेर तालुक्यातील गटेवाडी गावाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. गावात करण्यात आलेल्या बालविवाहमुक्ती सर्वेक्षणात एकही बालविवाह झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे जिल्ह्यात सर्वेक्षणाद्वारे बालविवाहमुक्तीच्या दिशेने पुढे आलेले गटेवाडी हे चौथे गाव ठरले आहे.बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ ची प्रभावी अंमलबजावणी, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन आणि समाजाची मानसिकता बदलणे या उद्देशाने उडान प्रकल्पामार्फत गावोगावी सर्वेक्षण व जनजागृती केली जात आहे. याच उपक्रमांतर्गत गटेवाडी येथे सरपंच मंगल चंद्रकांत गट आणि ग्रामस्थांच्या सहभागातून सर्वेक्षण करण्यात आले. पारनेरपासून सुमारे ११ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावाची लोकसंख्या ५०० पेक्षा अधिक आहे. गावातील प्रत्येक मुलगी शिक्षण घेत असून तिच्या शिक्षणासाठी पालकांसह संपूर्ण गावाची साथ मिळत असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले. गावात बालविवाह होत नसल्याचे तसेच



बाहेरील अल्पवयीन मुलीला सून म्हणून आणले जात नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मुलींनीही शिक्षण पूर्ण केल्यानंतरच विवाहाचा विचार करण्याची भूमिका मांडली. गटेवाडीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा विविध क्षेत्रांतील सक्रिय सहभाग. महिला शेती, दुग्धव्यवसाय, दूध डेअरी आणि कृषिपूरक व्यवसायांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. गावातील १०० पेक्षा अधिक तरुण भारतीय सैन्यदलात देशसेवा करीत असून ४० पेक्षा अधिक निवृत्त सैनिक गावात आहेत. सुमारे २५० वर्षांची पायी दिंडीची परंपराही गावाने जपली आहे. सर्वेक्षणादरम्यान मुलींचे शिक्षण, पालकांची मानसिकता, विवाहविषयक विचार, बालविवाहाची संभाव्य जोखीम आणि ग्रामस्तरीय बालसंरक्षण यंत्रणेची भूमिका यांचा आढावा घेण्यात आला. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या गावातील सुना, पोलीस उपनिरीक्षक तसेच महिला व बालकल्याण विभागातील अधिकाऱ्यांशीही संवाद साधण्यात आला.

बालविवाहमुक्त गाव ही केवळ बालविवाह न होण्याची स्थिती नसून मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी संपूर्ण समाजाने स्वीकारण्याची चळवळ आहे. मुलींचे शिक्षण सुरू ठेवणे, त्यांच्या मतांचा आदर करणे आणि विवाहापूर्वी वधू-वरांचे वय तपासणे, अशा बाबींवर या अभियानात भर दिला जात आहे.

करंदी गावानंतर पारनेर तालुक्यातील गटेवाडीनेही या परिवर्तनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. येत्या २७ नोव्हेंबर २०२६ रोजी जागतिक बालविवाहविरोधी दिनानिमित्त अंतिम पडताळणी व आवश्यक निकषांची पूर्तता झाल्यानंतर स्नेहालयच्या उडान प्रकल्पातर्फे गावाला विशेष बालविवाहमुक्त गाव प्रमाणपत्र देण्याचे नियोजन आहे. या उपक्रमात ग्रामपंचायत अधिकारी कविता अवधूत, सरपंच मंगल चंद्रकांत गट, माजी सैनिक खंडू गट, चंद्रकांत गट, अशोक गट, विठ्ठल डावखर, गणेश गट, शशिकांत भंडालकर आणि राहुल सकट यांच्यासह ग्रामस्थांनी सहभाग नोंदविला.

कोपरगावात ६ डिसेंबरला भव्य सर्वसमाजीय वधू-वर परिचय मेळावा; उत्स्फूर्त सहभाग नोंदवण्याचे स्नेहलताताई कोल्हे यांचे आवाहन

● कोपरगाव । वीरभूमी–

विधानसभा मतदारसंघाच्या मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या संकल्पनेतून रविवार, ६ डिसेंबर २०२६ रोजी कोपरगाव येथे भव्य सर्वसमाजीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.विवाहयोग्य तरुण-तरुणींना एकत्र आणून त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण घडवून आणणे आणि योग्य जोडीदार निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. विवाहयोग्य तरुण-तरुणी आणि त्यांच्या पालकांनी या मेळाव्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी केले आहे.

यावेळी या उपक्रमाबाबत अधिक माहिती देताना मा. आ. स्नेहलताताई कोल्हे म्हणाल्या की, अविवाहित तरुण-तरुणींची वाढती संख्या हा समाजासमोरील चिंतेचा विषय बनला आहे. शिक्षण आणि नोकरीनिमित्त बाहेरगावी स्थायिक होण्याचे वाढते प्रमाण, विवाहाच्या वेळी दोन्ही बाजूंकडून असलेल्या वाढत्या अपेक्षा तसेच हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथांमुळे विवाह जुळविण्यात अडचणी निर्माण होत असल्याच्याही काही घटना निदर्शनास येतात. पूर्वी नातेवाईक, परिचित आणि समाजातील ज्येष्ठ मंडळींच्या माध्यमातून विवाहयोग्य स्थळे सुचवली जात होती. मात्र, बदलत्या परिस्थितीत योग्य स्थळ शोधणे कठीण झाले आहे. विवाह जुळविताना मुला-मुलींनी एकमेकांना समजून घेणे, अवास्तव अपेक्षा टाळणे आणि हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथांना समाजातून हद्दपार करणे गरजेचे आहे. समाजात काम करताना अनेक पालकांनी आपल्या मुला-मुलींचे विवाह जमत नसल्याची चिंता व्यक्त केली. त्यातूनच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. विवाहयोग्य तरुण-तरुणींना एकत्र आणून त्यांच्या विचारांची देवाणघेवाण घडवून आणणे हे समाजासाठी पुण्याचे काम ठरेल, असे त्यांनी सांगितले.

या मेळाव्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या युवा सेवकांसह सर्व कार्यकर्ते सहकार्य करणार आहेत. आपल्या परिचयातील विवाहयोग्य वधू-वरांच्या कुटुंबीयांपर्यंत या उपक्रमाची माहिती पोहोचवून त्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहनही त्यांनी केले.हा मेळावा रविवार, ६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत संजीवनी इंग्लिश मीडियम स्कूल, कोपरगाव येथे होणार आहे.

मेळाव्यासाठी मोफत नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, ऑनलाइन नोंदणीसाठी क्यूआर कोडची व्यवस्था करण्यात आली आहे. नोंदणीची अंतिम मुदत ३ डिसेंबर २०२६ आहे. प्रत्यक्ष नोंदणीसाठी आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयात तसेच गणप्रमुख आणि विभागप्रमुखांकडे नोंदणी अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत.कोपरगाव मतदार संघासह जिल्ह्यातील सर्व जाती-धर्मांतील विवाहयोग्य तरुण-तरुणी आणि त्यांच्या पालकांनी या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी केले आहे.

चापडगाव विद्यालयाच्या व्हॉलीबॉल खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघात निवड



● शेवगाव । वीरभूमी–

महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दि . २२ रोजी अहिल्यानगर येथे आयोजित जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धेत चापडगाव विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत विभागीय स्पर्धे साठी अहिल्यानगर जिल्हा संघात स्थान मिळवले आहे.

या निवड प्रक्रियेत विद्यालयातील खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १४ वर्षे वयोगट मुलांमध्ये गायकवाड अथर्व सोमनाथ, गावंडे वंश किरण तर १६ वर्षे वयोगट मुलीमध्ये पातकळ गायत्री पांडुरंग, पातकळ प्रांजल देविदास, वाघमारे तनिष्का केशव, जाधव राजश्री श्रीधर, मडके स्नेहल अर्जुन, पवार साक्षी शरद व १६ वर्षे वयोगट मुलांमध्ये मडके प्रथमेश बाप्पासाहेब यांची निवड झाली. या निवड चाचणीत एकाच विद्यालयाच्या ९ खेळाडूंची निवड झाली ही भूषणावह बाब आहे.

या यशस्वी खेळाडूंचे आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधरजी काकडे, मा. जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी व सहप्रमुख अशोक आहेर, विद्यालयाचे प्राचार्य श्री. संपत दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाय, पर्यवेक्षक दुधाडे सर व सर्व शिक्षक, शिक्षकेतर बंधू-भगिनी यांनी निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले व त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर तहकिक व सादिक शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे चापडगाव विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात आणखी भर पडली आहे.

ओम सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांची मनगाव प्रकल्पाला मदत



● अहिल्यानगर । वीरभूमी –

नगर मनमाड रोडवरील देहरे – शिंगवे येथील मनगाव प्रकल्पाला बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांनी किराणा साहित्य भेट दिले. यावेळी प्रकल्पाचे प्रमुख डॉ. राजेंद्र व डॉ. सुचेता धामणे उपस्थित होते. बालिकाश्रम रोडवर दररोज मॉर्निंग वॉक करण्यासाठी येणाऱ्या ओम सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांनी एकत्र येऊन वर्गणी केली आणि यातून या प्रकल्पाला किराणा साहित्य दिले. यावेळी ग्रुपचे अध्यक्ष ॲड. अशोक गायकवाड, ॲड. बबनराव सुंबे, मधुकर साबळे, गोविंद खेर्डेकर, अशोक भूतकर, रमेश बोरुडे, सुदाम देशमुख, नवनाथ कुऱ्हे हे सहकुटुंब उपस्थित होते. मनगाव प्रकल्पात पाचशे मनोरुग्ण महिलांचा सांभाळ केला जात आहे. प्रकल्पातील स्वच्छता, व्यवस्था आणि सोयी, सुविधा उत्तम आहेत. मात्र मनोरुग्णांना दररोज औषधे आणि भोजनाचा दैनंदिन खर्च मोठा आहे. त्यासाठी दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन मदत करावी असे आवाहन ग्रुपचे अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी केले. प्रकल्पामध्ये सुरू करण्यात आलेले गाय गोठाचे काम कौतुकास्पद असल्याचे गायकवाड म्हणाले. यावेळी सदस्यांनी प्रकल्पातील सर्व उपक्रमांची पाहणी केली.

ऊसदर जाहीर होईपर्यंत गाळप बंद ठेवा; स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा इशारा!

ऊस वाहतूकदारांना पदाधिकाऱ्यांचे आवाहन । प्रतिटन ३५०० रुपये पहिली उचल देणाऱ्या पंचगंगा कारखान्याच्या ट्रॅक्टर चालकाचा सत्कार

● शेवगाव । वीरभूमी–

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळावा, यासाठी राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली तसेच निलेश लंके, जानकर, खताळ, लंघे यांच्यासह विविध नेते, संघटना आणि राजकीय पक्षांच्या वतीने काल करण्यात आलेल्या ऊसदर आंदोलनाला मोठे यश मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आज, दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत ऊस गाळप करण्याची आणि त्यानंतर ऊसदर जाहीर होईपर्यंत साखर कारखान्यांचे गाळप बंद ठेवण्याची सूचना दिली आहे.

या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी रस्त्यावर उतरले. त्यांनी ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरचालकांना शेतकऱ्यांच्या हक्काच्या लढ्याला सहकार्य करण्याचे आवाहन केले. योग्य ऊसदर जाहीर होईपर्यंत ऊसतोड आणि ऊस वाहतूक करू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.

यावेळी शेजारील जिल्ह्यातील पंचगंगा साखर कारखान्याचा ऊस वाहून नेणारा ट्रॅक्टर दिसताच पदाधिकाऱ्यांनी चालकाकडे चौकशी केली. पंचगंगा साखर कारखाना प्रतिटन ३५०० रुपये पहिली उचल देत असल्याचे समजताच पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. शेतकऱ्यांना चांगला दर देणाऱ्या कारखान्यांच्या ऊसतोड आणि वाहतुकीला आमचा विरोध नाही, उलट अशा कारखान्यांना आमचा पाठिंबा राहील, अशी भूमिका घेत पदाधिकाऱ्यांनी ट्रॅक्टरचालकाला पुष्पहार घालून त्याचा सत्कार केला.

दिवसभर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ऊस वाहतूकदार आणि शेतकऱ्यांना आंदोलनाची भूमिका समजावून सांगितली. तसेच, दि. २६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या बैठकीत ऊसदराचा योग्य निर्णय न झाल्यास दि. २८ नोव्हेंबर रोजी रास्ता रोको आणि रेल रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही दिला. या



आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी गावकऱ्यांसह ऊस उत्पादक शेतकरी तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दत्तात्रय फुंदे, मच्छिंद्र आरले आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना योग्य भाव देणाऱ्या कारखान्यांना आमचा विरोध नाही; मात्र शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा ठाम संदेश स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या कृतीतून दिला.

नैसर्गिक प्रसूतीबाबत जनजागृतीसाठी अहिल्यानगरमध्ये भव्य रॅली

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ नर्सिंगच्या ३४० विद्यार्थी व प्राध्यापकांचा सहभाग

● अहिल्यानगर । वीरभूमी–

मातृत्व हा स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा असतो. या काळात आईचे आरोग्य, बाळाची सुरक्षितता आणि सन्मानपूर्वक मातृत्व काळजी यांना सर्वोच्च प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. मात्र, अलीकडच्या काळात सिझेरियन प्रसूतींचे वाढते प्रमाण हा आरोग्य क्षेत्रातील चिंतेचा विषय बनला आहे. या पार्श्वभूमीवर नैसर्गिक प्रसूतीबाबत जनजागृती करण्यासाठी आणि सुरक्षित मातृत्वाचा संदेश समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अहिल्यानगरमध्ये भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत ३४० नर्सिंग विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

'सोसायटी ऑफ मिडवाईफ इंडिया' (SOMI) यांच्या वतीने नैसर्गिक प्रसूती पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी देशभरात राष्ट्रव्यापी वॉकथॉन आणि जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ नर्सिंग आणि रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रॅलीला सकाळी ९.१५ वाजता डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रापासून सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत रॅलीचा समारोप प्रोफेसर चौक येथे करण्यात आला.

सिझेरियन प्रसूती ही काही प्रसंगी आई आणि बाळाचे प्राण वाचविणारी अत्यावश्यक वैद्यकीय प्रक्रिया असते. मात्र, वैद्यकीयदृष्ट्या आवश्यकता नसताना केवळ पर्याय म्हणून सिझेरियन प्रसूतीचा अवलंब होऊ नये, हा या जनजागृती मोहिमेचा प्रमुख संदेश होता. प्रत्येक गर्भवती महिलेला तिच्या आरोग्यस्थितीनुसार योग्य वैद्यकीय सल्ला, नैसर्गिक प्रसूतीसाठी आवश्यक मार्गदर्शन, भावनिक आधार आणि सन्मानपूर्वक मातृत्व काळजी मिळाली पाहिजे. नैसर्गिक प्रसूतीला प्रोत्साहन देतानाच माता आणि बाळाची सुरक्षितता सर्वोच्च ठेवणे, प्रसूतीविषयक निर्णयांमध्ये महिलेच्या मताचा आणि सन्मानाचा आदर करणे तसेच आवश्यकतेनुसार योग्य वैद्यकीय हस्तक्षेप स्वीकारणे, ही या मोहिमेची प्रमुख भूमिका होती.

या रॅलीमध्ये नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक असे एकूण ३४० जण सहभागी झाले होते. हातात जनजागृतीपर फलक घेऊन आणि घोषणा देत विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये नैसर्गिक प्रसूतीचे महत्त्व पटवून दिले. आरोग्य क्षेत्रातील व्यक्तींसह समाजातील सर्व घटकांनी या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र संघटनेच्या अहिल्यानगर शाखेच्या सचिव डॉ. नीलम बागल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, सुदृढ मातृत्व आणि नैसर्गिक प्रसूतीची तयारी ही केवळ गर्भधारणेनंतर सुरू होणारी प्रक्रिया नसून मुलींच्या



किशोरवयापासूनच त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी मुली आणि महिलांनी दैनंदिन आहारात कॅल्शियम व लोहयुक्त पदार्थांचा पुरेसा समावेश करणे गरजेचे आहे.

या सामाजिक उपक्रमासाठी संस्थेचे वैद्यकीय संचालक प्रा. डॉ. अभिजित दिवटे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष श्री. अमर गुरव यांनी विशेष उपस्थिती दर्शवून उपक्रमाला पाठिंबा दिला.

संपूर्ण कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा ए. चांदेकर आणि उपप्राचार्या डॉ. योगिता औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्रीमती नीलिमा जगताप, श्रीमती रेबेका साळवे आणि कु. नम्रता शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. सकाळी १०.१५ वाजता रॅलीचा उत्साहात समारोप झाला.

SPOT NEWS

संदीप ठोंबे यांच्यासह कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडीत जाहीर पक्षप्रवेश!

● अहिल्यानगर । वीरभूमी–

वंचित बहुजन आघाडीचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली आणि राज्य कार्यकारणी सदस्य तथा जिल्हा प्रभारी ज्ञानेश्वर कवठेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अहिल्यानगर येथील व्ही.आय.पी. सर्किट हाऊस शासकीय विश्रामगृह येथे संदीप ठोंबे व त्यांचे कार्यकर्ते यांचा जाहीर पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. या पक्षप्रवेशामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होण्यास मदत होणार असल्याची भावना यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी संदीप जिजाबा ठोंबे, डॉ. भालचंद्र साळवे, योगेश शिंगाडे, सागर देठे, दत्ता सोनटक्के, वैभव सावंत, आशिष खरात, ईश्वर पाटीदार, दिनेश देवळ, ऋषी पवार, प्रकाश शिंदे, विठ्ठल जाधव, गौरव काळे, कार्तिक शिंदे, कुंदन जबरे, सूरज पवार, संदेश केदारे, अनिल विधाते, ऋतुराज अडागळे, अशोक पठारे, अण्णाभाऊ भिंगारदिवे आणि कल्याण सिताराम घोडके यांनी वंचित बहुजन आघाडीमध्ये जाहीर प्रवेश केला. नव्याने पक्षात दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षाचे निळे पंचे घालून स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रभारी ज्ञानेश्वर कवठेकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव आणि शेवगाव तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख यांनी नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. तसेच पक्षाच्या विचारधारेनुसार तळागाळातील वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन केले. या पक्षप्रवेशामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीचे संघटन अधिक बळकट होणार असून, नव्या कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे पक्षाच्या कार्याला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

पॅरा बेंच प्रेस स्पर्धेत अस्मिरोद्दीन सय्यद यांची सुवर्णपंचकाची कामगिरी!

● अहिल्यानगर । वीरभूमी–



जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे खेळाडू अस्मिरोद्दीन सय्यद यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पुणे येथील हिंजवडीमधील महात्मा फुले अपंग शिक्षण केंद्र येथे नुकत्याच पार पडलेल्या पाचव्या राज्यस्तरीय पॅरा ऑलिम्पिक बेंच प्रेस स्पर्धेत त्यांनी ८८ किलो वजनी गटात तब्बल १४१ किलो वजन उचलत सुवर्णपदक पटकावले. विशेष म्हणजे, सलग पाचव्या राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचा मान त्यांनी मिळविला असून, त्यांच्या या सुवर्णपंचकाच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या स्पर्धेतील दमदार कामगिरीच्या जोरावर अस्मिरोद्दीन सय्यद यांची मार्च महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राज्यस्तरावर सातत्याने आपले वर्चस्व सिद्ध करणाऱ्या अस्मिरोद्दीन यांनी पाच वेळा सुवर्णपदक पटकावत आपल्या मेहनतीची आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणाची प्रचिती दिली आहे. त्यांच्या या यशामागे नियमित सराव, शिस्तबद्ध व्यायाम, योग्य मार्गदर्शन आणि जिद्दीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यांना प्रशिक्षक विजय कनोजिया तसेच संघटनेचे चेअरमन विलास दवणे यांचे मार्गदर्शन लाभले. अस्मिरोद्दीन यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे संचालक ओंकार गुर्रम, फिटनेसचे सदस्य रुपेश गायकवाड, यश मोरे, अभि पठाडे, सुमीत जाधव आणि संघर्ष घागरे यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच आगामी राष्ट्रीय स्पर्धेतही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा दिल्या.

रामदास पुंडे यांचे निधन

● अकोले । वीरभूमी–



ढोकरी गावचे रामदास भाऊराव पुंडे (वय ६३ वर्षे) यांचे रविवार दि. २२ नोव्हेंबर रोजी अपघाती निधन झाले. प्रवरा परिसरात ते रामदास मामा म्हणून परिचित होते. अमृतसागर दुध संघाचे दुध वाहतूक ठेकेदार विकास पुंडे व सचिन पुंडे यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली, भाऊ, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या रक्षा विसर्जन विधी निमित्ताने झाड लावून समाजात एक आदर्श निर्माण केला आहे.

आ. विवेक कोल्हे व संत महंतांच्या उपस्थितीत

आत्मा मालिक ध्यानपीठाच्या स्वागत कमानीचे लोकार्पण

● कोपरगाव । वीरभूमी–



परमपूज्य सद्गुरू जंगलीदास गुरुमाऊली महाराज यांच्या आशीर्वादाने आत्मा मालिक ध्यानपीठाच्या स्वागत कमानीचा लोकार्पण सोहळा परमपूज्य परमानंद महाराज आणि आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या स्वागत कमानीमुळे आत्मा मालिक ध्यानपीठाच्या आध्यात्मिक वैभवात आणखी भर पडणार असून परिसराला एक वेगळी ओळख प्राप्त होणार आहे.

यावेळी आयोजित कार्यक्रमास परमपूज्य आत्मा मालिक सद्गुरू जंगलीदास गुरुमाऊली महाराज, परमपूज्य परमानंद महाराज, परमपूज्य निजानंद महाराज यांची पावन उपस्थिती लाभली.संस्थेचे सचिव बाळासाहेब गोरडे, कोषाध्यक्ष होन साहेब, विश्वस्त प्रदीप भंडारी, विश्वस्त प्रकाशजी गिरमे, सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन ज्ञानेश्वर परजणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती संभाजी आप्पा रक्ताटे, संचालक बाळासाहेब वक्ते साहेब, तसेच कारखान्याचे आजी-माजी सर्व संचालक, विविध संस्थांचे पदाधिकारी व ज्येष्ठ कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी कोकमठाण, संवत्सर, सडे, जेऊर व कुंभारी परिसरातील अनेक कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.याशिवाय राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंता शिंदे मॅडम,नाशिक येथील श्री. जमले साहेब, उपविभागीय अभियंता श्री.सुनील यादव यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार विवेक कोल्हे म्हणाले की, बालपणापासूनच आत्मा मालिक ध्यानपीठाशी आपला जिव्हाळ्याचा संबंध राहिला आहे. येथील आध्यात्मिक चैतन्य आणि सकारात्मक ऊर्जा नेहमीच प्रेरणा देणारी आहे. ध्यानपीठाच्या माध्यमातून देश-विदेशात आध्यात्मिक विचारांचा प्रसार करून सामाजिक परिवर्तन आणि समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू आहे. आज या ध्यानपीठामुळे कोपरगाव तालुक्याचे नाव जागतिक स्तरावर अभिमानाने घेतले जात आहे.

माजी मंत्री शंकरराव कोल्हे, स्नेहलताताई कोल्हे आणि बिपीनदादा कोल्हे यांच्या माध्यमातून कुटुंबाचे ध्यानपीठाशी नेहमीच आत्मीयतेचे संबंध राहिले आहेत. गुरुमाऊलींचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन आयुष्यात अनेकदा प्रेरणादायी ठरले.

श्री गणेश सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीवेळी मिळालेला आशीर्वाद राज्यभर त्यामुळे लोकप्रियता मिळाली. तसेच आमदार होण्यापूर्वीच गुरुमाऊलींनी व्यक्त केलेला विश्वास आजही स्मरणात आहे. स्वागत कमानीची जबाबदारी पूर्ण करून तिचे लोकार्पण होत असल्याचा विशेष आनंद आहे. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ध्यानपीठात येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी तसेच परिसरातील विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

परमपूज्य परमानंद महाराज यांनी कोल्हे कुटुंबाचे ध्यानपीठाशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध अधोरेखित केले. ध्यानपीठाच्या विविध उपक्रमांना कोल्हे कुटुंबाने नेहमीच सहकार्य केले आहे. आमदार विवेक कोल्हे यांना मिळालेली लोकसेवेची जबाबदारी त्यांनी राजकारणापलीकडे जाऊन सामाजिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातूनही पार पाडावी, असे आशीर्वचन त्यांनी दिले. या स्वागत कमानीखालून जाणाऱ्या हजारो भाविकांना 'आत्मा मालिक' हे नाव वाचून आत्मनामाचे स्मरण होईल आणि त्यातून पुण्यकर्म घडेल, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

मुक्या जीवांची तहान भागविण्यासाठी मोहटा वन परिसरात दुसरा पाणवठा!

मोहटा ग्रामपंचायत व पाथर्डी तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचा सेवाभावी उपक्रम

● पाथर्डी । वीरभूमी–



वन्यजीव आणि पशुपक्ष्यांची तहान भागविण्याच्या सेवाभावी उद्देशाने मोहटादेवी वन परिसरात दुसऱ्या पाणवठ्याची निर्मिती करण्यात आली. निसर्गातील मुक्या जीवांना पाण्याचा आधार मिळावा आणि वन्यजीव संवर्धनाची भावना समाजात अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने ग्रामपंचायत मोहटा प्रशासन आणि ग्रामपंचायत अधिकारी संघटना, पाथर्डी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि दादाभाऊ गुंजाळ यांच्या संकल्पनेतून, तसेच गटविकास अधिकारी राजेंद्र धस आणि अतिरिक्त गटविकास अधिकारी राजेंद्र म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली या जलसेवा उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

वन परिसरातील वन्यजीव आणि पशुपक्ष्यांना उन्हाळ्यासह पाणीटंचाईच्या काळात पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी या पाणवठ्याची निर्मिती करण्यात आली. मुक्या जीवांची तहान भागविणे हीदेखील मानवतेची महत्त्वपूर्ण सेवा असून, निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. 'सेवा माणसांचीच नव्हे, तर मुक्या जीवांचीही' या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमात विस्तार अधिकारी दत्तात्रय रणमाळ, रामनाथ कराड, रोहिदास आघाव, प्रमोद म्हस्के, हनुमान खेडकर, अशोक फुंदे, नितीन बटुळे, अमोल तांदळे, अमोल भवार, गोपीचंद रोंडे, महादेव हाडके, सुनील वाघ, संदीप ढाकणे, सचिन दळवी, रामेश्वर जाधव, कानिफनाथ हंडाळ, कृष्णा खटावकर, विनोद ओतारी, राहुल गाडेकर, राजेंद्र साखरे आणि बद्री घुगरे यांच्यासह मोहटा येथील ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविला.

तसेच विठ्ठल फुंदे, भगवान दहिफळे, मारुती दहिफळे, अजित दहिफळे, नामदेव दहिफळे, देविदास दहिफळे, अशोक दहिफळे, अशोक खेडकर, नारायण शिंदे, शिवाजी शिंदे, नवनाथ दहिफळे आणि संकेत दहिफळे यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

या कामासाठी ग्रामपंचायत अधिकारी अशोक फुंदे, ग्रामपंचायत कर्मचारी शिवाजी शिंदे आणि ग्रामरोजगार सेवक देविदास दहिफळे यांनी विशेष सहकार्य करून परिश्रम घेतले.

आयडीबीआय बँकेच्या खाजगीकरणाविरोधात अहिल्यानगरमध्ये गुरुवारी बँक कर्मचाऱ्यांचा एल्गार!

● अहिल्यानगर । वीरभूमी–

सार्वजनिक बँकिंग क्षेत्रासमोर निर्माण झालेली आव्हाने, आयडीबीआय बँकेच्या प्रस्तावित खाजगीकरणाचे संभाव्य परिणाम आणि त्याचा बँक कर्मचारी चळवळीवर होणारा प्रभाव या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यासाठी अहिल्यानगरमध्ये गुरुवारी (दि. २६ नोव्हेंबर) विशेष मार्गदर्शन व संवाद सभेचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा बँक कर्मचारी संघटनेच्या वतीने दिल्लीगेट येथील स्पाय हॉटेलमध्ये सायंकाळी ५ वाजता ही सभा होणार आहे.

देशातील सार्वजनिक बँकिंग व्यवस्थेचे भवितव्य, बँकिंग क्षेत्रातील बदलती धोरणे, खासगीकरणाचे संभाव्य परिणाम आणि बँक कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण या विषयांना सध्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर बँकिंग उद्योगातील सद्यस्थितीचा आढावा घेऊन कर्मचारी चळवळीपुढील आव्हाने आणि आगामी संघर्षाची दिशा यावर या सभेत सविस्तर विचारमंथन केले जाणार आहे.

या सभेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य बँक कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष कॉ. धनंजय कुलकर्णी राहणार आहेत. बेट्राचे अध्यक्ष तसेच आयडीबीआय कर्मचारी संघटनांच्या संयुक्त मंचाचे (युनायटेड फोरम ऑफ आयडीबीआय युनियन्स) निमंत्रक कॉ. देविदास तुळजापूरकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून 'आयडीबीआय बँकेचे खाजगीकरण आणि बँक कर्मचारी चळवळीपुढील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

बदलत्या शिक्षण प्रवाहाशी जुळवून घेणारेच भविष्यात टिकतील : सचिन जोशी

गंगा-मृणालिनी स्मृती व्याख्यानमालेत शिक्षणातील नव्या वाटा विषयावर मार्गदर्शन

● शेवगाव । वीरभूमी–



शिक्षण क्षेत्रात बदलाचा वेग प्रचंड वाढला असून, या बदलत्या प्रवाहानुसार स्वतःमध्ये बदल घडवून आणणारेच भविष्यात टिकून राहतील. बदल स्वीकारण्यास असमर्थ ठरणाऱ्यांची अवस्था बिकट होईल, असे प्रतिपादन नाशिक येथील इस्पेलिअर हेरिटेज स्कूलचे संस्थापक तथा शिक्षणतज्ज्ञ सचिन जोशी यांनी केले.

शेवगाव येथील भारदे साक्षरता प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित गंगा-मृणालिनी स्मृती व्याख्यानमालेत 'शिक्षणातील नव्या वाटा' या विषयावर पहिले पुष्प गुंफताना जोशी बोलत होते. यावेळी प्रा. रमेश भारदे, हरीश भारदे व रागिणी भारदे यांच्या हस्ते जोशी यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी जोशी म्हणाले की, सर्जनशीलता, सहकार्य, संवाद कौशल्य व चिकित्सक विचार ही जीवनकौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारी शिक्षणपद्धती आजच्या काळाची गरज आहे. मात्र, दुर्दैवाने आपली शिक्षणव्यवस्था अजूनही अपेक्षित बदलांपासून दूर आहे. दर तीन वर्षांनी अभ्यासक्रमात बदल होणे आवश्यक असतांना आपण तीस वर्षांपासून तोच अभ्यासक्रम शिकवत आहोत. शिक्षणाने केवळ माहिती देण्याऐवजी विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे.

डिजिटलायझेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) शिक्षण क्षेत्रात मोठे परिवर्तन घडत आहे. या बदलांमुळे करिअरच्या नव्या संधी निर्माण होत असून, विद्यार्थ्यांनी त्यासाठी सज्ज राहणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी माणुसकी, संवेदनशीलता व भावनिक ओलावा यांचे महत्त्व कमी होणार नाही.

माणसाला आकार देणारी खरी ऊर्जा त्याचे आंतरिक विचार असतात. त्यामुळे प्रत्येकाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे.

यावेळी शाळेचे गुणवंत माजी विद्यार्थी तथा पुणे येथील गरवारे महाविद्यालयाचे प्रा. रामदास बडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास माजी शिक्षक, विद्यार्थी व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य उमेश घेवरीकर यांनी तर सूत्रसंचालन अमृत गोरे यांनी केले. सतीश जगदाळे यांनी आभार मानले.

दिव्यांगत्वावर मात करीत केशव भांगरे यांची ११९ गडांची यशस्वी मोहीम!

ठाणे जिल्ह्यातील सर्वाधिक उंचीचा २,८१५ फूट उंच माहुलीगड केला सर । आठ वर्षीय चिरंजीव तन्मयचीही दहाव्या किल्ल्यावर यशस्वी चढाई

● अकोले । वीरभूमी–

जिद्द, चिकाटी आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर दिव्यांगत्वावर मात करीत राजूर (देवगाव), ता. अकोले येथील गिर्यारोहक केशव किसन भांगरे यांनी गड-किल्ले सर करण्याचा आपला ध्यास कायम ठेवला आहे. कार्यालयीन कामकाज सांभाळून सुट्टीच्या दिवशी गड-किल्ल्यांची भटकंती करणाऱ्या भांगरे यांनी रविवारी ठाणे जिल्ह्यातील सर्वाधिक उंचीचा २,८१५ फूट उंच माहुलीगड सर केला. हा त्यांच्या मोहिमेतील ११९ वा गड ठरला. विशेष म्हणजे, त्यांच्यासोबत असलेल्या आठ वर्षीय चिरंजीव तन्मय केशव भांगरे यानेही माहुलीगड सर करून आपल्या वैयक्तिक गिर्यारोहण मोहिमेतील दहाव्या किल्ल्याची नोंद केली. बाप-लेकाची ही साहसी भटकंती सर्वांचे आकर्षण ठरली.

महाराष्ट्रातील यापूर्वी ११८ गड-किल्ले आणि शिखरे यशस्वीपणे सर केल्यानंतर केशव भांगरे यांनी रविवारची सुट्टी साधत माहुलीगडाची मोहीम आखली. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या या गडावर त्यांनी भगवा ध्वज फडकावून आपला ११९ वा गड सर करण्याचा टप्पा पूर्ण केला.

माहुलीगड हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला ऐतिहासिक किल्ला आहे. शहाजीराजे आणि राजमाता जिजाऊ यांचेही या गडावर वास्तव्य होते. माहुली, पळसगड आणि भंडारगड या दुर्गत्रिकुटाच्या परिसरात भटकंती करीत भांगरे यांनी ऐतिहासिक वारशाचे दर्शन घेतले.

या मोहिमेत त्यांच्यासोबत नेहमी गड-किल्ल्यांची भटकंती करणारे भाऊराव भांगरे (नाशिक), मधुकर सगभोर (राहाता), तुकाराम कचरे (कोपरगाव), गणेश देशमुख (पुणे), विष्णू लोखंडे (अकोले), उमेश वेडे (टिटवळा), हिरामण भवारी (ठाणे) आणि प्रवीण पदमेरे (ठाणे) सहभागी झाले होते.

केशव भांगरे यांच्या गिर्यारोहण क्षेत्रातील कामगिरीची विविध विक्रम पुस्तिकांमध्ये नोंद झाली आहे. 'जिनियस बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये ११४ अवघड गड सर करणारे पहिले दिव्यांग गिर्यारोहक म्हणून त्यांच्या कामगिरीची नोंद आहे. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये ९० गड-किल्ले, तर 'तेलंगणा बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये १०० गड-किल्ले सर केल्याची नोंद करण्यात आली आहे.

'लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये हरिश्चंद्रगडावरील सुमारे १,८०० फूट उंच कोकणकड्यावरून रॅपलिंग करून ठाणे जिल्ह्यात जाण्याच्या त्यांच्या साहसी कामगिरीची नोंद झाली आहे. महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसूबाई शिखर त्यांनी आतापर्यंत १३ वेळा सर केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना आंतरराष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय असे २५ हून अधिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

दिव्यांग व्यक्तींना प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून केशव भांगरे यांची महाराष्ट्रात ओळख आहे. शिव ऊर्जा प्रतिष्ठान, संभाजीनगर यांच्या सहकार्याने महाराष्ट्रातील १११ दिव्यांग व्यक्तींना कळसूबाई शिखरावर घेऊन जाण्याचा विक्रमही त्यांनी केला आहे.

> नोकरी आणि कार्यालयीन कामकाज सांभाळून सुट्टीच्या दिवशी मी गड-किल्ल्यांची भटकंती करतो. गड सर करणे म्हणजे केवळ शिखर गाठणे नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जगणे होय. माझ्या मुलाला, चि. तन्मयला लहानपणापासूनच गडांचा इतिहास समजावा, त्याच्यात इतिहासाविषयी आवड निर्माण व्हावी, यासाठी मी त्याला प्रत्येक मोहिमेत सोबत घेऊन जातो.
>
> **– केशव भांगरे,** दिव्यांग गिर्यारोहक

दिव्यांग व्यक्तीदेखील गड चढू शकते, हे समाजाला दाखवून देणे हाच माझ्या गिर्यारोहणामागील मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाचे १५० गड सर करण्याचे माझे स्वप्न आहे, अशी भावना केशव भांगरे यांनी व्यक्त केली.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

दुष्काळाच्या झळांत शिक्षणाची वाट सुकर करणारी 'माणुसकी'!

राज देशमुख यांच्या पुढाकारातून श्रीगोंद्यातील २५० विद्यार्थ्यांना सायकलींचा आधार; गरजूंच्या स्वप्नांना मिळाली नवी गती

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

कुणाच्या वाट्याला दुष्काळ, कुणाच्या वाट्याला गरिबी, तर कुणाच्या वाट्याला शिक्षणासाठी मैलोनमैल पायपीट! ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांच्या वाट्याला आलेला हा संघर्ष ओळखून त्यांच्या मदतीसाठी पुढे सरसावलेल्या 'माणुसकीची चळवळ'ने सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श घालून दिला आहे. राज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली श्रीगोंदा तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील २५० गरजू विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या सायकलींचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला केवळ सायकलींचे बळ मिळाले नाही, तर त्यांच्या स्वप्नांनाही नवी दिशा मिळाली आहे. श्री. अमित भोसले यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला. मांडवगण कात्राबाद, वडघूल, पिसोरेखांड, कामठी यांसह परिसरातील दुष्काळग्रस्त गावांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागात शिक्षणाची इच्छा असूनही अनेक मुलांना शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी दररोज अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागते. घरची हलाखीची परिस्थिती, दुष्काळामुळे निर्माण झालेली आर्थिक ओढाताण आणि अपुऱ्या वाहतूक सुविधा यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रवासात अनेक अडचणी उभ्या राहतात. काहींसाठी शाळेची वाट ही केवळ अंतराची नसते, तर ती परिस्थितीशी दोन हात करण्याची असते. विद्यार्थ्यांचा हाच संघर्ष कमी करण्यासाठी 'माणुसकीची चळवळ'ने सायकलींच्या माध्यमातून मदतीचा हात पुढे केला.

या सायकलींमुळे विद्यार्थ्यांचा शाळेपर्यंतचा प्रवास अधिक सोयीचा होणार असून वेळ आणि श्रमांची बचत होणार आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे शिक्षणासाठी रोज करावी लागणारी धडपड काही प्रमाणात कमी होऊन विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अधिक वेळ देता येणार आहे. सायकलींचा ताबा मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद या उपक्रमाची फलश्रुती अधोरेखित करणारा ठरला.

सामाजिक कार्य म्हणजे केवळ मदतीचे साहित्य वाटणे नव्हे, तर एखाद्याच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्यासाठी त्याच्या अडचणी समजून घेऊन योग्य वेळी मदतीचा हात देणे होय. याच भावनेतून 'शिक्षणासाठी एक पाऊल पुढे, उज्ज्वल भविष्यासाठी एक नवी दिशा!' या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. समाजातील दानशूर व्यक्ती आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी योगदान दिल्यास ग्रामीण भागातील अनेक मुलांचे भविष्य उजळू शकते, हा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी पालवी देणारा उपक्रम

■ गरजू विद्यार्थ्यांच्या हाती दिलेली सायकल ही केवळ प्रवासाचे साधन नाही, तर शिक्षणाची संधी, स्वावलंबनाचा विश्वास आणि स्वप्नांच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. दुष्काळाच्या भूमीत माणुसकीचा हा ओलावा विद्यार्थ्यांच्या भविष्याला नक्कीच नवी पालवी देणारा ठरेल!



राज देशमुख यांच्या वतीने व्यक्त करण्यात आले की, समाजातील वंचित आणि गरजू घटकांना आधार देणे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळे दूर करणे आणि ग्रामीण भागातील मुलामुलींना प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देणे, हे 'माणुसकीची चळवळ'चे प्रमुख उद्दिष्ट आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था आणि सामाजिक जाणिवा जपणाऱ्या नागरिकांच्या सहकार्याने भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील.

या उपक्रमाचे ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी शेतकरी नेते घनश्याम शेलार, सुवर्णा सचिन जगताप, सिद्धेश्वर देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. उपक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन करुन संजय आनंदकर यांनी आभार मानले.

म्हैसवळण घाट रस्त्याचे काम सुरू न झाल्यास रास्ता रोको!

ऑल इंडिया आदिवासी काँग्रेस कमिटीकडून रस्त्याची पाहणी

● **अकोले । वीरभूमी–**

देवठाण ते म्हैसवळण घाट या महत्त्वाच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, वाहनचालकांसह परिसरातील ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गेल्या तीन ते चार वर्षांपासून या रस्त्याची दुरवस्था कायम असतानाही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया आदिवासी काँग्रेस कमिटी, अकोले तालुक्याच्या वतीने समशेरपूर-आढाळा विभागाचा दौरा करून रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.



देवठाण ते म्हैसवळण घाट हा दोन तालुक्यांसह दोन जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. पाहणीदरम्यान पदाधिकाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थ आणि वाहनचालकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. ग्रामस्थांनी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

या रस्त्याच्या दुरुस्ती व कामासाठी येत्या चार ते पाच दिवसांत सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देऊन पाठपुरावा करण्यात येणार आहे. त्यानंतरही काम सुरू न झाल्यास आढाळा खोऱ्यातील ग्रामस्थांना सोबत घेऊन तीव्र रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला.

या पाहणी दौऱ्यात ॲड. संतोष बोऱ्हाडे, अक्षय उघडे, जालिंदर भांगरे, विजय घारे, अरुण गोंदके, बाबुराव बोऱ्हाडे, नवनाथ बोऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते समाधान भांगरे, भोरू पेढेकर, सुरेश घोगरे, राजेंद्र भांगरे यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

अकोले-म्हैसवळण घाट मार्गावरून अकोले आगाराची एसटी बस सुरू होती. मात्र, रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे अवघ्या आठ दिवसांत ही बससेवा बंद करण्यात आली. त्यामुळे परिसरातील नागरिकांना प्रवासासाठी खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. खराब रस्त्यावरून वाहन चालवताना चालकांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. विशेषतः प्रसूतीसाठी रुग्णांना रुग्णालयात घेऊन जाताना मोठी कसरत करावी लागते. गेल्या तीन ते चार वर्षांपासून या रस्त्याची दयनीय अवस्था असूनही संबंधित यंत्रणेचे लक्ष नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे, अशी व्यथा वाहनचालकांनी मांडली.

महिलांच्या सन्मानासाठी सार्वजनिक ठिकाणी हिरकणी कक्षांची उभारणी आवश्यक!

आ. मोनिका राजळे । शेवगाव बसस्थानकातील हिरकणी कक्षाचे लोकार्पण

● **शेवगाव । वीरभूमी–**

महिलांचा सन्मान केवळ विचारांपुरता मर्यादित न राहता त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करणाऱ्या सुविधांच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरला पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी प्रवास करणाऱ्या स्तनदा मातांना आपल्या बाळाला सुरक्षित, स्वच्छ आणि गोपनीय वातावरणात स्तनपान करता यावे, यासाठी प्रत्येक बसस्थानकासह गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी स्वतंत्र हिरकणी कक्ष उभारणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.



शेवगाव बसस्थानक येथे इनरव्हील क्लब ऑफ शेवगावच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या स्तनपान अर्थात हिरकणी कक्षाचे लोकार्पण आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमासाठी त्वचारोगतज्ज्ञ डॉ. वेदांत संजय लड्डा यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी बोलताना आमदार राजळे म्हणाल्या की, महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालये, एसटी बसस्थानके तसेच विधिमंडळ परिसरात स्तनदा मातांसाठी स्वतंत्र हिरकणी कक्ष उपलब्ध करून देण्याची संकल्पना महिलांच्या सन्मानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. प्रवासादरम्यान सार्वजनिक ठिकाणी बाळाला स्तनपान करताना महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी सुरक्षित आणि स्वतंत्र जागा उपलब्ध झाल्यास माता व बालकांची गैरसोय टाळता येईल. त्यामुळे ही सुविधा केवळ शहरी भागापुरती मर्यादित न ठेवता ग्रामीण भागातील बसस्थानकांवरही उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

हिरकणी कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतलेल्या इनरव्हील क्लब ऑफ शेवगावच्या पदाधिकाऱ्यांचे तसेच या उपक्रमासाठी सहकार्य करणारे डॉ. वेदांत संजय लड्डा यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमाला भाजप शेवगाव मंडलाध्यक्ष महेश फलके, एसटी आगारप्रमुख चौधरी, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम बिहाणी, युसूफखान पठाण, डॉ. संजय लड्डा, भाजप शहराध्यक्ष राहुल बंब, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सदस्य गणेश रांधवणे, नगरसेविका आशा बुलबुले, मंदाकिनी मुरकुटे, सतीश लांडे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष रूपाली तडवळकर, खजिनदार भाविका आर्य, वसुधा सावरकर, सुनीता गवळी, अश्विनी गवळी, सुवर्णा देवकाते, मीनाक्षी रासने, मंगल काकडे, राजश्री रसाळ, हिरल पटेल, निकिता मोता, सुजाता खेडकर, अमोल माने, राजेंद्र घुगे आणि अमोल मिसाळ आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्लबच्या सेक्रेटरी डॉ. मनीषा लड्डा यांनी केले, तर अश्विनी गवळी यांनी आभार मानले.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा २६ नोव्हेंबरला राज्यव्यापी कामबंद आंदोलन; बेमुदत संपाचा इशारा

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्यातील विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या न्याय्य मागण्यांबाबत शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. विविध मागण्यांवर शासनाकडून वारंवार आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्ष शासन निर्णय निर्गमित होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शासनाच्या या उदासीन भूमिकेच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक संयुक्त कृती समितीने आता आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी राज्यव्यापी कामबंद आंदोलन करण्यात येणार असून, या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचारीही सहभागी होणार आहेत. त्यानंतरही शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष वैभव रोडी, उपाध्यक्ष बाळासाहेब इघे आणि सचिव संतोष कानडे यांनी दिली.

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचारी शैक्षणिक व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहेत. विद्यार्थ्यांचे प्रवेश, परीक्षा, निकाल, प्रशासकीय कामकाज, ग्रंथालये आणि प्रयोगशाळांचे कामकाज सुरळीत ठेवण्यात या कर्मचाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. मात्र, या कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.

सतीश नेहे यांना राष्ट्रीय 'दीपज्योती एक्सलन्स पुरस्कार' प्रदान

● **अकोले । वीरभूमी–**

सामाजिक, पर्यावरण आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अकोले येथील सतीश नेहे यांना राष्ट्रीय 'दीपज्योती एक्सलन्स पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. अमरदीप बालविकास फाऊंडेशन आणि टी.एम.जी. क्रिएशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ रोजी बानूबाई वाडी, बारापाडा, नवीन पनवेल, नवी मुंबई येथे आयोजित दीपोत्सव २०२६ सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आदिवासी पाड्यांवरील आदिवासी बांधव आणि मुलांसाठी आयोजित या विशेष दीपोत्सव कार्यक्रमात कॅप्टन मनोज भामरे, केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाचे सहाय्यक आयुक्त शंकर बिरासदार, फाऊंडेशनचे संस्थापक व समाजसेवक एन. डी. खान आणि समाजसेविका सलमा खान यांच्या हस्ते सतीश नेहे यांचा सन्मान करण्यात आला.

अमरदीप बालविकास फाऊंडेशन आणि टी.एम. जी. क्रिएशन्स या महाराष्ट्रातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत संस्था आदिवासी पाड्यांवरील बांधव आणि मुलांच्या विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवितात. सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या सदस्यांचा या संस्थांच्या वतीने दरवर्षी गौरव करण्यात येतो. महाराष्ट्रातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या १२ व्यक्तींना दीपोत्सव सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कॅप्टन मनोज भामरे, शंकर बिरासदार (सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त, केंद्रीय वस्तू व सेवा कर विभाग), ज्येष्ठ साहित्यिक सुरेश भोपी, ज्येष्ठ अभिनेत्री उर्मिला डांगे, राष्ट्रीय बुद्धिबळ पंच मंगला बिराजदार, चित्रपट सेन्सॉर बोर्डाचे सदस्य विलास खानोलकर, ज्येष्ठ समाजसेवक भगवान बडगुजर, उद्योजिका ऐश्वर्या पुणेकर, पत्रकार पंडित फंगाळ, समाजसेविका रेशमा शेख, कारवा फाऊंडेशनच्या संस्थापिका शायना मिरजानकर, अभिनेते गणेश वाघमारे आणि सूरज कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाचे आयोजन सलमा एन. खान यांनी केले होते. संकल्पना व नियोजन एन. डी. खान यांचे होते. समन्वयक म्हणून रत्नाकर घरत, राजकुमार ताकमोगे, डॉ. विजय मोरे आणि मीना ताकमोगे यांनी काम पाहिले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला.

हजारो पणत्यांच्या प्रकाशात उजळला अगस्ति आश्रम!

त्रिपुरारी पौर्णिमेचा दीपोत्सव ठरला अकोलेकरांसाठी आकर्षण

● **अकोले । वीरभूमी–**

भक्तिमय वातावरण, हजारो पणत्यांचा लखलखता प्रकाश आणि भाविकांची अलोट गर्दी... अशा मंगलमय वातावरणात अकोले येथील श्री अगस्ति आश्रमात त्रिपुरारी पौर्णिमेचा दीपोत्सव मंगळवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हजारो पणत्यांच्या प्रकाशाने संपूर्ण आश्रम परिसर उजळून निघाला होता. दीपोत्सवाचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी अकोलेकरांनी मोठी गर्दी केली होती. या नयनरम्य सोहळ्याने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

त्रिपुरारी पौर्णिमा अर्थात देवदिवाळी हा प्रकाश, श्रद्धा आणि भक्तीचा संगम असलेला उत्सव अगस्ति आश्रमात दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गेल्या अनेक वर्षांपासून जपली जाणारी ही परंपरा यंदाही तितक्याच उत्साहात पुढे नेण्यात आली. विविध सामाजिक संस्था, संघटना आणि भाविकांच्या सहभागामुळे या दीपोत्सवाचे स्वरूप अधिक व्यापक होत आहे.

यंदाच्या दीपोत्सवात अगस्ति देवस्थान ट्रस्ट आणि अगस्ति ऋषी गुरुकुल यांचा विशेष सहभाग होता. सामाजिक व विधायक कार्यात नेहमी अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या पदाधिकारी व सदस्यांनी १००१ पणत्या प्रज्वलित करून दीपोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हजारो पणत्यांच्या प्रकाशात उजळलेला आश्रम परिसर आणि त्यातून निर्माण झालेले भक्तिमय वातावरण उपस्थितांना मंत्रमुग्ध करणारे होते. अनेक नागरिकांनी या अविस्मरणीय क्षणांची छायाचित्रे व सेल्फी टिपत आनंद व्यक्त केला.

यावेळी अगस्ति देवस्थानचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ यांनी दीपोत्सवाच्या आयोजनाची रूपरेषा विशद केली. धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजातील एकोपा वृद्धिंगत होण्यासोबतच श्रद्धा आणि परंपरांचे जतन होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

प्रसंगी अगस्ति देवस्थानचे विश्वस्त गुलाबराव शेवाळे, रामनिवास राठी, अनिल गायकवाड, ह.भ.प. दीपक महाराज देशमुख, राजेंद्र महाराज नवले, गणेश महाराज वाकचौरे, संकेत महाराज आरोटे, मच्छिंद्र भरीतकर, रविंद्र चोथवे, रामेश्वर रासने, मधुकर वाकचौरे, नवनाथ गायकवाड, रमेश वाकचौरे, दिलीप कोटकर, बाळासाहेब घोडके, रामनाथ देशमुख, भाऊसाहेब कासार, श्रीनिवास रेणुकादास, रामनाथ शिंदे, संदेश वाळुंज आदी उपस्थित होते.

तसेच रोटरी क्लब अकोले सेंट्रलचे अध्यक्ष गंगाराम करवर, सचिव सचिन आहेर, खजिनदार प्रा. डॉ. संजय ताकटे, ॲड. बी. जी. वैद्य, अमोल वैद्य, विद्याचंद्र सातपुते, डॉ. सुशील बेनके, प्रा. डॉ. पंकज नाईकवाडी, ललित छल्लारे, विजय पावसे, प्रदीप गोडे यांच्यासह क्लबचे सदस्य व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.





कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी देवस्थानचे व्यवस्थापक रामनाथ मुर्तडक तसेच रोटरी क्लबच्या सदस्य व परिवाराने विशेष परिश्रम घेतले. स्वागत व सूत्रसंचालन ह.भ.प. दीपक महाराज देशमुख यांनी केले.

श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक सहभाग यांचा सुंदर संगम ठरलेल्या या दीपोत्सवाने अगस्ति आश्रम परिसर दीपमय करण्यासोबतच अकोलेकरांच्या मनातही आनंद, भक्तिभाव आणि उत्साहाचा प्रकाश निर्माण केला.